बुरखा
प्रगतिरोधक नाही

लेखक
सय्यदा परवीन रिजवी
अनुवाद
जाहिद आबिद खान

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

प्रस्तावना

समाजाच्या उन्नती व अवनतीमध्ये स्त्रियांची किती महत्त्वाची भूमिका असते याबाबत जगाच्या क्रांतीवर लक्ष ठेवणाऱ्या विचारवंतांना कल्पना आहेच. जेव्हा स्त्रिया लज्जाहीन होऊन अश्लीलता व नग्नतेचा मार्ग स्वीकारतात तेव्हा देशाचा ऱ्हास झाल्याशिवाय राहात नाही. इस्लाम मानवी प्रवृत्तीस अनुकूल असा धर्म आहे. तो पुरुषासह स्त्रियांच्या उन्नतीवर भर देतो. बुरखा हा त्यातलाच एक भाग आहे.

बुरखा म्हणजे काय?

बुरखापध्दतीने प्रगती होते की अधोगती याबाबतचा खुलासा सय्यदा परवीन रिजवी यांनी नश्तर मेडिकल कॉलेज मुलतान येथे ऑल इंडिया इंटरकॉलिजिएट चर्चासत्रात दिलेल्या भाषणात केला आहे. चर्चेचा विषय होता.

बुरखा देशाच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळा आहे काय?

सय्यदा साहेबांच्या भाषणास सर्वोत्तम भाषण म्हणून पारितोषिक मिळाले होते. विशेष म्हणजे सय्यदा साहेबानी पडद्याआडून भाषण देण्याची इच्छा प्रगट केली होती. मात्र परवानगी नाकारण्यात आली. नाइलाजास्तव त्यांनी डोक्यावर चादर पांघरून भाषण केले. चर्चासत्रांति उपस्थित श्रोत्यांची मते आजमावण्यात आली. नव्व्यानव टक्के लोकांनी बुरखापध्दतीच्या बाजूने मतदान केले.

प्रकाशक

बुरखा देशाच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा आहे?

महोदय, या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यापूर्वी बुरखा म्हणजे काय व कशासाठी? हे जाणून घेणे आवश्यक आहे. बुरखा प्रयोजनामागील भूमिका जाणून घेतल्याशिवाय त्याचे फायदे व तोटे लक्षात येणार नाहीत. ते समजून घेतल्यानंतर आम्हाला कोणत्या दिशेने प्रगती करावयाची आहे, हे निश्चित करता येईल व बुरखा प्रगतीस अडथळा निर्माण करतो किंवा नाही याबद्दल निर्णय देता येईल.

'हिजाब' या अरबी शब्दाचे उर्दू भाषांतर 'परदा' असे करण्यात आले आहे. 'हिजाब' हा शब्द कुरआनोक्तीतून घेण्यात आला आहे. त्या आयतीत अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या घरात नि:संकोचपणे ये-जा करणाऱ्यांना मनाई केली. घरातील महिलांकडून काही हवे असेल तर ते पडद्याआडून मागावे, असे आदेश देण्यात आले. याच आदेशाच्या अनुषंगाने बुरखापध्दत अस्तित्वात आली. तद्नंतर बुरख्यासंबंधात आलेल्या इतर आदेशांना बुरख्याचे

आदेश (अहकामे हिजाब) असे संबोधण्यात आले.

बुरखाबाबतच्या आदेशांचे तपशीलवार वर्णन कुरआनच्या चोवीस व तेहतीस या दोन अध्यायात (सूरहमध्ये) दिले गेले आहे. ज्यात म्हटले आहे,

"महिलांनी आपल्या घरात मोकळेपणाने व थाटाने वावरावे. इस्लाम धर्माच्या प्रसारापूर्वीचे असभ्य राहणीमान सोडून द्यावे व नटून सजून आपल्या सौंदर्याचे सर्वत्र प्रदर्शन करत फिरू नये. घराबाहेर जाताना डोक्यावर एक चादर पांघरावी. ज्या दागिन्याने मधुरनाद (ध्वनि) निर्माण होत असेल असे दागिने काढून ठेवावेत. घरातील सदस्यांसमोर वावरताना विशेष खबरदारी बाळगावी. ज्यांच्याशी विवाह करता येतो (गैरमहरम) अशा नातेवाईकांसमोर शृंगार करून जाण्याचे टाळावे. घरातील आप्तजना (महरम) समोर जातानासुध्दा आपल्या वक्षस्थळावर ओढनी (दुपट्टा) पांघरून आपले संपूर्ण शरीर आच्छादित होईल असे वस्त्र धारण करावे." पुरुषांना आदेश देण्यात आले आहेत, *"त्यांनी आपल्या आयाबहिणीच्या खोलीत जाताना परवानगी घ्यावी जेणेकरून अचानक प्रवेशाने बेसावध बसलेल्या महिलांवर खजील होण्याची पाळी येणार नाही."* यालाच 'परदा' (बुरखापध्दत) म्हणतात.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी याबाबत अधिक खुलासा करताना म्हटले आहे,

"स्त्रियानों, आपल्या सख्ख्या भावा व वडिलांसमोर जातानासुध्दा चेहरा, हाताचा पंजा व घोट्यापर्यंत पायाव्यतिरिक्त संपूर्ण शरीर वस्त्राने आच्छादित करूनच जावे. असे पारदर्शक व घट्ट वस्त्र धारण करू नये की ज्यातून शरीर प्रदर्शन घडेल. तसेच आपल्या घरातील आप्तजनां (महरम) शिवाय इतर कोणत्याही नात्याच्या पुरुषासोबत एकांतात बसू नये."

पैगंबरांनी स्त्रियांना सुगंध (अत्तर वगैरे) लावून घराबाहेर जाण्याबाबतही मनाई केली आहे. मस्जिदीत महिलांना नमाज पढण्यासाठी वेगळ्या जागेची व्यवस्था करण्याचे आदेश दिले होते. एकाच रांगेत स्त्री-पुरुषांनी नमाज अदा करण्यास अनुमती नाकारण्यात आली आहे. नमाज अदा झाल्यानंतर महिला निघून जाईपर्यंत पैगंबर मुहम्मद (स.) व इतर मुस्लिम पुरुष मस्जिदीत आपल्या बसल्या ठिकाणावरून उठत नसत.

या आदेशाची कुरआनातील सूरह (अध्याय) नूर व अहजाब आणि पैगंबरांच्या आदेशा (आहदीस) मध्ये पडताळणी करता येईल. बुरख्यामध्ये हल्ली बरीच विविधता दिसून येते. मात्र बुरख्याबाबतच्या मूळ तत्त्वांत व उद्देशांत फरक झालेला नाही. मी कोणाचे नाव घेऊ इच्छित नाही, मात्र मला सांगावेसे वाटते की जे लोक सांगतात की 'बुरखा आमच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण करतो,' ते दुतोंडीपणाचे धोरण प्रगट करीत आहेत. त्यांचे वक्तव्य अल्लाह व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विरोधात आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे त्यांच्या म्हणण्यानुसार, अल्लाह व पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आमच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण केले आहेत. खरोखर आम्ही जर अशा प्रकारचे विचार बाळगत असू

तर आम्ही स्वत:ला मुस्लिम कसे मानावे? ज्या अल्लाह व पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असा अन्याय केला आहे ते त्यांच्यापासून पूर्णत: अलिप्त का होत नाहीत? अल्लाह व पैगंबर मुहम्मद (स.) यांनी बुरख्याचा आदेश दिलेलाच नाही, असे म्हणताच येणार नाही. मी आताच सांगितले आहे की ज्याची इच्छा असेल त्याने कुरआन वा हदीसचे अध्ययन करून शंकासमाधान करून घ्यावे. एखाद्यास हदीसच्या अध्ययनाने समाधान होत नसेल तर त्यांनी कुरआनचे आदेश पडताळून पाहावेत.

बुरखापध्दतीबाबत थोडे बारकाईने अभ्यास केल्यास तीन महत्त्वाचे उद्देश लक्षात येतील.

(१) पुरुष व स्त्रियांच्या चारित्र्यांचे रक्षण करण्यात यावे व अशा दुर्वर्तनांपासून त्यांना अलिप्त ठेवावे, जे स्त्री-पुरुषांच्या स्वैर सहजीवनामुळे निर्माण होतात.

(२) स्त्री-पुरुषांचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात यावे. नैसर्गिकरित्या जी कर्तव्ये स्त्रियांनी पार पाडावयाची आहेत ती त्यांनी निश्चिंतपणे पार पाडावीत व ज्या जबाबदाऱ्या पुरुषांच्या वाट्यास येतात त्या त्यांनी व्यवस्थितपणे पूर्ण कराव्यात.

(३) कुटुंबव्यवस्था मजबूत व सुरक्षित करावी. कुटुंबव्यवस्था जीवनाच्या इतर व्यवस्थांपेक्षा अधिक महत्त्वाची बाब आहे. बिनबुरख्याच्या कुटुंबव्यवस्थेने महिलांना कुटुंबात गुलामांचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्या सर्व प्रकारच्या हक्कांपासून वंचित झाल्या आहेत. तसेच ज्यांनी महिलांना त्यांचे हक्क तर दिले आहेत मात्र बुरख्याच्या बंधनातून मुक्त ठेवले आहे, अशा कुटुंबांची व्यवस्था अस्तव्यस्त झाली आहे. इस्लाम स्त्रियांना सर्व अधिकारसुद्धा देऊ पाहातो, त्याचबरोबर घरातील व्यवस्थाही सुरक्षित ठेवू इच्छितो. हे केवळ बुरखापध्दतीचा अवलंब केल्यानेच शक्य होऊ शकते.

बंधुभगिनींनो,

मी आपणास विनंती करते की आपण कृपया उपरोक्त तीन उद्देशांवर शांतपणे विचार करावा. चारित्र्यरक्षणाच्या समस्येबाबत जर कोणी उदासीन असेल तर त्यांच्या बाबतीत मी काही करू शकत नाही. जे चारित्र्याबाबत गंभीर आहेत त्यांनी विचार करायला हवा की ज्या समाजात स्त्रिया नटूनथटून स्वैराचरण करत असतील व पुरुषांसोबत सर्वच क्षेत्रांत एकत्र काम करीत असतील तर तेथील लोकांचे चारित्र्य कसे व कुठवर सुरक्षित राहू शकेल? आपल्या देशात जसजशी स्वैराचारी परिस्थिती निर्माण होत आहे तसतशी लैंगिक अपराधांची संख्या वाढत चालली आहे. त्याबाबत वर्तमानपत्रात आपण रोजच वाचत असतो. बुरखापध्दतच लैंगिक अपराधाचे मूळ कारण आहे, तसेच बुरखा न राहिल्यास लोकांमधील स्त्रियांबद्दलचे कुतुहल व आकर्षण आपोआप कमी होईल, असे म्हणणे व मानणे साफ चुकीचे आहे. ज्या काळात बुरखापध्दत नव्हती त्या काळातसुद्धा लैंगिक आकर्षण कमी झाले नव्हते. त्यांच्या वासनासक्तीने चरमसीमा गाठली होती. नग्नतेने समाधान होत नव्हते, म्हणून उघडपणे

कामक्रीडा होऊ लागली व आता तर लैंगिकसंबंधाचे परवाने देऊन ही वासनात्मक भूक शमण्याचे चिन्ह दिसत नाही. अमेरिका, इंग्लंड व इतर देशांच्या वर्तमानपत्रांत अनेक लैंगिक अपराधांबाबतच्या बातम्या प्रसिध्द होत असतात. ही समाधानकारक परिस्थिती मानली जाईल काय? ही केवळ वैयक्तिक चारित्र्याची समस्या नसून संपूर्ण सामाजिक संस्कृतीचा प्रश्न बनला आहे. समाजात सहजीवनाची प्रथा जितकी जास्त वाढत जात आहे तितकाच जास्त स्त्रियांच्या शृंगारिक प्रसाधनाचा खर्च वाढत जात आहे. हा वाढता खर्च काबाडकष्ट करून मिळालेल्या रास्त कमाईने पुरा होत नाही म्हणून लाच, अफरातफर व इतर भ्रष्टचाराने वाढता खर्च पूरा केला जात आहे. त्यामुळे पूर्ण समाज पोखरला जात आहे. कोणत्याच कायद्याची योग्यरित्या अंमलबजावणी होऊ शकत नाही. जे लोक आपल्या स्वत:च्या इच्छांवर ताबा ठेवू शकत नाहीत ते दुसऱ्यांवर शिस्तीचे नियम कसे लागू करू शकतील? जो आपल्याच कौटुंबिक जीवनात विश्वासपात्र नसेल तो समाज व देशाशी एकनिष्ट कसा राहू शकेल?

स्त्री-पुरुषांचे कार्यक्षेत्र वेगळे असावे ही एक नैसर्गिक व्यवस्था आहे. स्त्रीला मातृत्वपद देऊन तिचे कार्यक्षेत्र दाखवून देण्यात आले आहे. पुरुषाला पितृत्वाचा अधिकार देऊन इतर जबाबदाऱ्या त्याच्यावर सोपविण्यात आल्या आहेत. स्त्री-पुरुषांच्या शरीररचनेत आवश्यक ते फरक निर्माण करून, दोहोंना वेगळी मानसिकता, शारीरिक क्षमता व गुण प्रदान करण्यात आले आहेत. मातृत्वाची जबाबदारी कौशल्याने पार पाडता यावी म्हणून तिला अधिक संयम व सहनशील प्रवृत्ती प्राप्त झाली आहे. तिच्या ममत्व व कोमल भावनांमुळे बालकांचे संगोपण व पालनपोषण अत्यंत सहृदपणे पार पाडले जाते. पुरुष त्या मानाने कणखरवृत्तीचा असतो. त्याच्यावर कुटुंबाच्या रक्षणाच्या व उदरनिर्वाहाच्या कठीण जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या आहेत. स्त्री पुरुषांचे नैसर्गिक कार्यक्षेत्र वाटप जर आपणास मान्य नसतील तर जगास मातृत्वाला मुकावे लागेल व परिणामत: संपूर्ण मानवसमाज हैड्रोजन वा अणुबॉम्बविना संपुष्टात येईल.

स्त्रियांनी मातृत्वाच्या नैसर्गिक जबाबदारीबरोबरच पुरुषांसह राजकीय, आर्थिक, औद्योगिक व इतर जबाबदाऱ्या पार पाडाव्यात अशी अपेक्षा करणे म्हणजे महिलांवर अन्याय व अत्याचार करणे आहे. मानवजातीच्या उत्पत्ती व सेवा-शुश्रूषेची संपूर्ण जबाबदारी ती एकटीच पार पाडीत असते. त्यात पुरुषांचा काडीमात्र सहभाग नसतो. या उलट पुरुषांच्या जबाबदारीतही तिने सहभागी व्हावे हे कितपत न्याय्य ठरेल?

स्त्रियांनी परिस्थितिनुरुप अन्यायकारक जबाबदाऱ्यांचा स्वीकार केला आहे. एवढेच नव्हे तर आता तर अधिकाधिक सामाजिक स्वातंत्र्य व अधिकार मिळविण्याकरिता त्यांनी सामूहिक चळवळी सुरु केल्या आहेत. आपण मातृत्वाचा उपहास केला आहे. गृहणीचा अपमान केला आहे. महिलांनी घरात राहून केलेल्या सेवा-शुश्रुसेला तुच्छ लेखले आहे. तिच्या सेवाकार्याचे महत्त्व पुरुषांचे राजकारण, उद्योगधंदे व युध्दाच्या जबाबदाऱ्यांपेक्षा कमी मानता येणार नाही. बिचाऱ्या स्त्रियांनी विवश होऊन पुरुषांच्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या

आहेत. पुरुषांची कामे न केल्यास तिला सन्मानजनक वागणूक देण्यास पुरुष तयार होत नव्हता. इस्लामने महिलांना घरगुती स्त्रीसुलभ जबाबदाऱ्या पार पाडण्याचा आदेश दिला होता. मातृत्व व बालकांच्या संगोपनाच्या उदात्त कार्यामुळे तिला समाजात सन्मानजनक स्थान प्राप्त होते. मात्र आता कुटुंबव्यवस्थेबाबतचा आपला दृष्टिकोनच बदलत चालला आहे. आपला आग्रह आहे की स्त्रियांनी मातेची कर्तव्ये पार पाडावीत, त्याबरोबरच तिने उच्चशिक्षण प्राप्त करून मॅजिस्ट्रेटसारखे पद भूषवावे, पुरुषांच्या मनोरंजनासाठी नृत्य व संगीताच्या महफिलीही सजावाव्यात. अशा अनेक प्रकारच्या कामांचे ओझे तिच्यावर लादले गेल्यामुळे ती एकही जबाबदारी पूर्णत: समाधानकारकपणे पार पाडू शकत नाही. ज्या कामाकरिता तिचा जन्म झालेला नाही, जे तिच्या शरीराला पेलवणार नाही, जे तिच्या व्यक्तिमत्त्वाला शोभणार नाही अशी कामे तिच्यावर सोपवण्यात आली आहेत. मात्र तिचे कौतुक झालेच तर ते केवळ तिच्या सौंदर्य व स्त्रीत्वामुळेच होते!

बंधुभगिनींनो,

सुज्ञ व चारित्र्यवान नागरिक निर्माण करणाऱ्या कुटुंबव्यवस्थेला आपण गौणस्थान देत आहोत. पादत्राणे व दारूगोळा निर्माण करणाऱ्या कारखान्यापेक्षा कुटुंबसंस्था निश्चितच श्रेष्ठतर आहेत. स्त्रियांना चारित्र्य घडविण्याची आवश्यक क्षमता व कोमल मानसिकता निसर्गाने देऊ केली आहे. घरगुती जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या कर्तव्यनिष्ट महिला घरात सदैव कार्यमग्न असतात. त्यांनी त्यांच्या जबाबदाऱ्या सक्षमपणे व नैपुण्याने पार पाडाव्यात म्हणून त्यांना उच्च शिक्षण व योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. कुटुंबसंस्थेचे संचालन तिने आत्मविश्वासाने, निश्चिंतपणे, संतोषजनकरित्या अंमलात आणावे म्हणून बुरखापध्दत अवलंबण्यात आली होती. त्यामुळे स्त्रिया विचलित न होता आपली कर्तव्ये कौशल्याने पार पाडू शकत होत्या. गृहिणी सक्षम आणि सुरक्षित असून घरकारभार व्यवस्थितपणे पार पाडीत आहेत. या विश्वासाने पुरुषही निश्चिंतपणे आपल्या घराबाहेरील जबाबदाऱ्या पार पाडू शकत होते. आता आपण या प्रकारच्या गृहव्यवस्थेस नवयुगाच्या प्रगतीसाठी नाकारू पाहात आहोत. याकरिता एकतर आपणास पुरातन कुटुंबव्यवस्थेचा अवलंब करून स्त्रियांना गुलामीचे जीवन द्यावे लागेल किंवा घरांना पादत्राणे वा दारूगोळासारख्या वस्तुनिर्मितीच्या कारखान्यांचे स्वरूप द्यावे लागेल.

मला वाटते की बुरखा पद्धत नष्ट करून आणि इस्लामने महिलांना दिलेले कायदेशीर व आर्थिक अधिकार कायम ठेवून कुटुंबव्यवस्था सुरक्षित ठेवता येणार नाही. आपणास नवयुगाची प्रगती हवी आहे की कुटुंबव्यवस्था सुरक्षित ठेवायची आहे? याबाबत शांतपणे विचार करून निर्णय घ्यायचा आहे.

प्रगती ही फार विस्तृत संज्ञा आहे. या संज्ञेची कोणतीच निश्चित परिभाषा नाही. एकेकाळी बंगालच्या आखातापासून थेट अटलांटिक महासागरापर्यंत मुस्लिमांचे राज्य

पसरले होते. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात ते अग्रेसर होते. सांस्कृतिक व वैचारिक पात्रतेच्या बाबतीत त्यांची बरोबरी करणारा कोणीही नव्हता. मात्र त्या काळात बुरखापध्दत अस्तित्वात होती. इस्लामी इतिहासाचे अध्ययन केल्यास लक्षात येईल की त्या काळात मोठमोठे नावाजलेले मुस्लिम संत, विचारवंत, विद्वान, राज्यकर्ते, लेखक व शूरवीर होऊन गेलेत. ते सर्व महापुरुष अशिक्षित व अडाणी मातांच्या पोटी जन्माला आले नव्हते. बुरखापध्दत अंमलात असूनही अनेक महिलांनी ज्ञान व विद्वतेच्या क्षेत्रात उच्चस्थान प्राप्त केले होते. विज्ञान, कला, वाङ्मय आदि क्षेत्रांत नैपुण्य प्राप्त केले होते. तत्कालीन मुस्लिमांच्या प्रगतीच्या मार्गात बुरखापध्दतीने कोणतीच अडचण निर्माण झाली नाही. आजही बुरखापध्दतीचा अवलंब करून मुस्लिम समाजास प्रगती करणे शक्य आहे. मात्र पाश्चात्य देशांतील प्रगतीस बुरखापध्दत अडगळीची सिध्द होऊ शकते. त्यांनी नीतिमत्ता व कौटुंबिक व्यवस्थेच्या विनाशाचा धोका पत्करून प्रगती प्राप्त केली आहे. महिलांना त्यांच्या कार्यक्षेत्रांतून मुक्त करून पुरुषांच्या कार्यक्षेत्रांत प्रवेश दिला आहे. या पध्दतीद्वारा त्यांनी आपल्या कार्यालयात व कारखान्यांसाठी दुप्पट मानवी शक्ती प्राप्त करून प्रगती केली आहे. मात्र असे करताना त्यांना गृहसुखाला मुकावे लागले आहे. आजसुद्धा काही गृहणीमुळे त्यांची घरे सुस्थितीत असल्याचे निदर्शनास येतात. पुरुषांसोबत धनार्जन करणाऱ्या स्त्रिया कौटुंबिक जबाबदाऱ्या योग्यरित्या पार पाडू शकत नाहीत. त्यांच्या वैवाहिक जीवनाचा अंत घटस्फोटात होतो. त्यांची मुले वाईट वळणावर जातात. त्यांचा बहुतेक वेळ हॉटेल्स व क्लबमध्ये जातो. त्यांना घर स्वर्गमय वाटत नाही. त्यांनी समाजासाठी चांगले नागरिक निर्माण करण्याचे कार्य सोडून दिले आहे. अशा प्रगतीस प्रगती कशी म्हणता येईल?

-०- समाप्त -०-